Impact Factor 7.331

ISSN 2349-638x

Peer Reviewed And Indexed

# AAYUSHI INTERNATIONAL INTERDISCIPLINARY RESEARCH JOURNAL (AIIRJ)

Monthly e-Journal

VOL-IX ISSUE-VI JUNE 2022

Address
- Devgiri Nagar, Ambajogai Road, Latur.
- Tq. Latur, Dis. Latur 413512 (MS.)
- (+91) 9922455749, (+91) 8999250451

Email
- aiirjpramod@gmail.com
- aayushijournal@gmail.com

Website
- www.aiirjournal.com

CHIEF EDITOR – PRAMOD PRAKASHRAO TANDALE

| Sr.No. | Author Name | Research Paper / Article Name | Page No. |
|---|---|---|---|
| 28 | Dr. Babasaheb Sakharam Tonde | Conceptual Framework of Political Elites and its Levels in Democratic India | 105 To 107 |
| 29 | Dr.Priyanka Satyajeet Mane | The conceptual study of Panchabhoutika utpatti of Dosha – Dhatu – Malam | 108 To 110 |
| 30 | Dr. Appayya V Melavanki | Definitions And Forms of Physically Handicaped in Different Aspects | 111 To 116 |
| 31 | Aliya Taranum Mohd Kursheed khan | Challenges of Rural Development : Indian Experience | 117 To 122 |
| 32 | Dr. Milind. D. Thavare & Dr. Umesh D. Shirsath | Snake Bite Treatment & Management | 123 To 126 |
| 33 | डॉ. किशोर पवार | *'नवल काका'— एक असहज बूढ़ा पिता* | 127 To 130 |
| 34 | डॉ. अल्पना व्यास | सर्वपल्ली डॉ. राधाकृष्णन् के दर्शन का राजनीतिक पहलू | 131 To 135 |
| 35 | डॉ. बालाजी विठ्ठलराव डिगोळे | संत ज्ञानेश्वरांच्या स्फूट कवितेतील परमात्म रूपाचे वर्णन | 136 To 140 |
| 36 | प्रा. डॉ. अरूण बळीराम धालगडे | स्वावलंबी शिक्षण ही काळाची गरज | 141 To 143 |
| 37 | प्रा.डॉ. डी. के. कदम | प्रधानमंत्री ग्रामीण आवास योजना एक वास्तव | 144 To 147 |
| 38 | मिलिंद हरिभाऊ ढाले<br>प्रा. डॉ. उषा नामदेवराव पाटील | अमरावती महसूल विभागातील अल्पभूधारक शेतकरी सोयाबीन उत्पादन प्रक्रियेचे आर्थिक अध्ययन | 148 To 154 |

# प्रधानमंत्री ग्रामीण आवास योजना एक वास्तव

प्रा.डॉ. डी. के. कदम
हु.जयवंतराव पाटील महाविद्यालय,
हिमायतनगर, नांदेड.

**प्रस्तावना :-**

अन्न,वस्त्र, निवारा ह्या मानवाच्या मुलभूत गरजा आहेत, या गरजापैकी निवाराचा मुलभूत गरजेचा अभ्यास प्रस्तुत शोध निबंधात करण्यात आला आहे. निवारा हा मानवाच्या सुरक्षिततेच्या दृष्टीने अतिशय आवश्यक महत्त्वपूर्ण घटक आहे. कारण प्रत्येक मानवाच्या राहणीमानावर निवारा हा परिणाम करणारा आहे. त्यामुळे ग्रामीण समाजातील लोकांची निवाऱ्यांची स्थिती जाणून घेणे महत्त्वाचे आहे. ग्रामीण भागात राहणाऱ्या लोकांचे निवास (घर) सारखे नसते, त्यात काही खापराचे कौलारू, पत्राचे (टिन) झोपडी, कुडमातीचे तर काही लोकांचे सिमेंट कॉंक्रेट तर काही चिरेबंदी स्वरुपाचे घरे असतात. घर (निवास) करते आहे. यावरून व्यक्तीच्या राहणीमानाचा दर्जा ठरवला जातो. ज्यांचे घर सिमेंट कॉंक्रेट, चिरबंदी स्वरुपाचे आहे. त्या लोकांचा दर्जा श्रीमंत वर्गात मोडतो तर, ज्या लोकांचे घर कौलारू खापराचे आहे त्याचा मध्यम वर्गात समावेश होतो. ग्रामीण भागातील ज्या लोकांचे घर कुड मातीचे, पत्राचे (टिन) झोपडीवजा स्वरुपाचे आहे, त्याचा समावेश गरीब या द्रारिद्रय रेषेखाली स्थितीत जीवन जगतांना दिसून येतात. हे वास्तव आहे. व्यक्तीचा राहणीमानाचा दर्जा ठरवतो असतांना त्यांचे आहार, उत्पन्न, निवास, चेनीच्या वस्तू या गोष्टीचा विचार केला जातो त्यामुळे प्रामुख्याने घर कसे स्वरुपाचे आहे. यांचा विचार केला जातो. पूर्वी ग्रामीण भागातील बहुतांश लोकांची घराची स्थिती अतिशय वाईट स्वरुपाची होती. त्यामुळे प्रथमत: गरिब लोकांना सुरक्षित निवासस्थान मिळावे यासाठी इंदिरा गांधी आवास योजना, राजीव गांधी आवास योजना, रमाई आवास योजना प्रधानमंत्री आवास योजना इत्यादी योजना गरीब कुटूंबातील लोकांना पक्के घर उपलब्ध करुन देणे यासाठी या योजना राबविण्यात येतात. प्रस्तुत शोध निबंधात प्रधानमंत्री ग्रामीण आवास योजना एक वास्तव या सखोल अध्यन करण्याचा प्रयत्न केला आहे.

भारतीय समाजात शहरी आणि ग्रामीण आणि आदिवासी समाजासाठी वेगवेगळ्या स्वरुपाच्या योजना योजना राबविल्या जातात. प्रधानमंत्री आवास योजना शहरी ग्रामीण समाजासाठी राबवली जाते. या योजनेचे शहरीभागात बजेट जास्त आहे. म्हणजे एका आवासासाठी (घर) 2 लाख 67 हजार रुपये अनुदान दिल्या जाते. ग्रामीण भागात 1,50,000/- (एक लाख पन्नास हजार रु.) अनुदान दिले जाते. प्रस्तुत शोध निबंधात प्रधानमंत्री ग्रामीण आवास योजनेचा अभ्यास केला आहे.

**अध्ययनाचा उद्देश :**

1) प्रधानमंत्री आवास योजनेचा सखोल अभ्यास करणे.
2) प्रधानमंत्री आवास योजनेची अंमलबजावणी कशी होते याचा सखोल अभ्यास करणे.
3) प्रधानमंत्री आवास योजनेतील समस्यांचा अभ्यास करणे.

**तथ्य संकलन**

प्रस्तुत शोधनिबंध पूर्ण करण्यासाठी प्राथमिक आणि द्वितीय तथ्य संकलन पद्धतीचा उपयोग केला, असून प्राथमिक तथ्य संकलनात निरीक्षण, मुलाखत या तंत्राचा उपयोग करण्यात आला दुय्यम तथ्य संकलनात विषयास पुस्तके, वर्तमान पत्रे इंटरनेट WWW. साईट उपयोग करण्यात आला.

**तथ्य विश्लेषण :-**

भारतीय ग्रामीण समाजाला विकासाच्या प्रवाहामध्ये आणण्यासाठी ग्रामीण भागात 2 ऑक्टोंबर 1952 सामुदायिक ग्रामीण विकास योजनेचा सुरूवात झाली हे वास्तव आहे. ग्रामीण भागाचा सर्वांगीण विकास व्हावा या उद्देश अनेक योजना राबविल्या जातात. इ.स. 1975 मध्ये स्वर्गीय पंतप्रधान इंदिरा गांधी यांनी वीस कलमी कार्यक्रम सुरूवात केला यात ग्रामीण भागातील लोकांसाठी आवास याचा समावेश होतो.

ग्रामीण भागातील दारिद्रय रेषेखालील लोकांना घरकुल योजना चालू होती. इंदिरा गांधी आवास योजनेचा प्रधानमंत्री ग्रामीण आवास योजना म्हणून ओळखले जाते. या योजनेचा मुख्य उद्देश गरीब कुटूंबांना पक्क्या स्वरुपाचे घर देणे हा आहे.

प्रधानमंत्री आवास योजना केंद्र पुरस्कृत योजना असून सन 1995-96 पासून स्वतंत्रपणे राबविली जाते. ग्रामीण भागातील द्ररिद्रय रेषेखालील बेघर/कच्चेघर असलेल्या कुटूंबांना घरकुल बांधकामासाठी अर्थसहाय्य देणे हा योजनेचा उद्देश आहे. या योजनेच्या लाभार्थ्यांची निवड ग्रामपंचायती मार्फत केली जाते. या योजनेला PMAY या नावाने ओळखले जाते 1 जुन 2015 रोजी सुरू करण्यात आलेली प्रधानमंत्री आवास योजना शहरी तसेच ग्रामीण भागात दोन्ही भागासाठी आहे. म्हणुन या योजनेला प्रधानमंत्री आवास योजना शहरी आणि प्रधानमंत्री आवास योजना-ग्रामीण म्हणून ओळखले जाते.

प्रधानमंत्री आवास योजना ही ग्रामीण समाजातील गरीब कुटूंवाना लाभदायी ठरली आहे. या योजनेमुळे ग्रामीण भागात घराचे पक्के बांधकाम करण्यास चालना मिळाली आज ग्रामीण भागात प्रधानमंत्री आवास योजनेचे अनुदान हे एक लक्ष पन्नास हजार आहे. ग्रामीण भागातील कुटूंबांना बांधकाम करण्यासाठी अनुदान अल्पस्वरुपाचे असले तरी शासनाने काही आपले स्वत:चे काही पैसे खर्च करुन घरबांधकाम करावी ही मानसिकता ग्रामीण भागातील लोकांची झाल्याची दिसून येते. आज हि योजना ज्यांना हक्काचे घर करावयाचे आहे. त्यांना मागेल घर मिळते एक भावना सर्व सामान्याच्या मनात निर्माण झाली. प्रधानमंत्री आवास योजना अर्ज करावा या विषयी सर्वांना माहिती झाले. या योजनेचे अनुदान हे टप्पप्पाने प्राप्त होते कारण काम लाभ झाल्यावर अनुदान दिल्या जाते.

प्रधानमंत्री आवास योजनेचा घरकुलासाठी संबंधीत व्यक्तीने प्रथम आपल्या जागा उपलब्ध असल्याचा नमुना नं.8 चाउतारा घ्यावा लागतो. परंतु यापूर्वी घरकुलाचा लाभ मिळालेला नसावा. कारण याअगोदर जर लाभ मिळाला नसेल तर तो या योजनेसाठी पात्र असतो. म्हणुन यापुर्वी घरकुलाचा लाभ न घेतल्याचे ग्रामसेवक यांचे प्रमाणपत्र बंधनकारक असते. यानंतर संबंधीत व्यक्तीने उत्पन्नचे प्रमाणपत्र, जातीचे प्रमाणपत्र द्यावे लागते. 100 रुपयाच्या बॉन्ड पेपरवर घरकुलाचा करारनामा जोडून द्यावा लागतो.

**प्रधानमंत्री आवास योजनेचे हप्ते**

| अ.क्र. | तपशील | रक्कम |
|---|---|---|
| 1 | पहिला हप्ता | 15000 |
| 2 | दुसरा हप्ता | 45000 |
| 3 | तिसरा हप्ता | 40000 |
| 4 | चौथा हप्ता | 20000 |
| | एकुण | 1,20,000/- |

प्रधानमंत्री आवास योजनेचे अनुदान हे पहिला हप्ता 15000 रुपये दिल्या जातो. हा हप्ता ॲडव्हान्स म्हणुन दिल्या जातो. त्यानंतर घरकुलाचे पाया बेसिमेंट केले जाते. दुसऱ्या हप्ता गृहनिर्माण अभियंता आणि ग्रामसेवक हे मिळून प्रत्यक्ष नजरी पाहणी अहवालानुसार घरचे बांधकाम झालेले पाहून मुल्यांकनानुसार दुसरा हप्ता लाभार्थ्यांच्या खात्यावर रक्कम जमा केला जातो हे रक्कम लाभार्थी ऑनलाईन धनादेशाद्वारे केले जाते त्यामुळे आता थोड्याफार प्रमाणात भ्रष्टाचाराला आळा बसत असल्याचे दिसुन येते. अशा प्रकारे वरील हप्ते हप्त्याने हप्त्याने नजरी पाहणी करून दिल्या जाते. ही रक्कम 1,20,000/- रुपये जमा केले जाते. 18 हजार रु. घर बांधकामासाठी रोजगार हमी वरील हे रोजगार काम करतात त्यांच्या खात्यावर जमा केली जाते. जवळपास 1,38,000/- रुपये प्रधानमंत्री ग्रामीण आवास योजना लाभार्थींची त्यांना लाभ होत असल्याचे दिसून येते.

प्रधानमंत्री ग्रामीण आवास योजना ही ग्रामीण भागातील गरीब कुटूंबासाठी अतिशय फलदायी आहे. परंतु या योजनेत आहे. दोष आढळून येतात. या योजनेचा लाभ गरीबापेक्षा श्रीमंतांना जास्त होतांना दिसून येतो. प्रधानमंत्री ग्रामीण आवास योजनेचा गरिब, सर्वसामान्य कुटूंबाची पिळवणूक होते. कारण सरपंच, ग्रामसेवक, आणि गृहनिर्माण अभियंता यांच्याकडून आर्थिक पिळवणुक होते. प्रत्यक्ष असे निरीक्षणातून मुलाखत असे अढळून येते की, सरपंच तुम्हाला या योजनेचा लाभ देतो सरपंच कुठे स्वतंत्र, काही ठिकाणी ग्रामसेवक दोघेजन मिळवून 3 ते 5 हजार रुपये घेत असल्याचे दिसून आले.

गृहनिर्माण अभियंता जेव्हा नजरी पाहणी करण्यासाठी प्रत्यक्ष येतो तेंव्हा ते प्रत्येक वेळेस काही तरी मागणी करत असतो. प्रधानमंत्री ग्रामीण आवास योजनेचे सर्व हप्ते मिळपर्यंत कुणाचे 2000 तर कुणाकडून 3000 हजार रुपये घेतल्याचे दिसून आले. ग्रामसेवक आणि गृहनिर्माण अभियंता जेंव्हा प्रत्यक्ष पाहणी करुन घरकुलाची संचिका पंचायत समितीला पाठविल्या जाते तेंव्हा त्याठिकाणी संचिका पास करुन क्लार्क कमीत प्रत्येक हप्त्याला 200 ते 500 रुपयाची मागणी करुन पिळवणुक करतांना दिसून येतात हे प्रत्यक्ष संचिका पास होऊन जेंव्हा पंचात समितीच्या ऑपरेटर ऑनलाईन धनादेश जमा करतांना सर्व लाभार्थी 400 ते 500 रु. लाच घेत असतो हे वास्तव आहे. ग्रामसेवक, गृहनिर्माण अभियंता, सरपंच, क्लार्क आणि पंचायत समितीतील कर्मचारी या सर्वांना कमी अधिक प्रमाणात लाच द्यावी लागते हे वास्तव आहे. कारण ग्रामसेवक संरपंच यांच्या विरुद्ध कुणी तक्रार करत नाही. तक्रार केली तर आपले लाभार्थी यादितून नाव कमी जाईल अशी त्यांची मानसिकता असल्याचे दिसून आले. काही बोटावर मोजण्या इतपत लोकांनी ग्रामसेवक, सरपंच यांच्या विरोधात तक्रार केली तर त्यांच्या संचिका पंचायत समितीत गहाळ करणे काही त्रुटी काढणे असे प्रकार होत असल्याचे दिसून येते. तालुका कंधार पंचायत समिती एक उदाहरण आहे की, एका कार्यकर्त्यांनी लाच देण्यासाठी विरोध केला तेंव्हा तेथील ऑपरेटर यांनी त्यांच्या वाद घातला. त्यानंतर त्यांनी त्यांची फाईल मध्ये पहिला हप्ता जमा केला तेंव्हा अंबुबाई शेषेराव कांबळे असे नाव होते. लाज देण्या घेण्याचा वाद लागला तेंव्हा दुसरा हप्ता टाका असे म्हणून जेंव्हा संचिका गेली तेंव्हा ऑपरेटरने ए.एस.कांबळे करुन नावात चूक केली लाभार्थी पंचायत समितला अनेक चकरा मारल्या परंतु काही फरक पडला नाही. पपंचायत समितीचे गट अधिकारी यांनी ग्रामपंचायत ठराव मागीतला तेंव्हा ग्रामपंचायत ठरावामध्ये पण नाव आंबूबाई शेषेराव कांबळे होते. तेंव्हा गटविकास अधिकारी यांनी A.S.Kamble नाव केले होते. अनुष्का शेषेराव कांबळे या गावात या नावाची व्यक्ती नव्हती. तेंव्हा ग्रामसेवकांनी पत्र लिहून दिले अनुष्का कांबळे नावाची व्यक्ती आमच्या गावात नाही पण ऑपरेटरच राग कमी झाला नाही. लाच दिली नाही म्हणुन शेवटी हे लाभार्थी प्रकरण प्रलंबित ठेवले हे वास्तव आहे.

प्रधानमंत्री ग्रामीण आवास योजनेतील एक महत्त्वाचा दोष म्हणजे ही योजना एवढी चांगली आहे या योजनेचा लाभ काम करणारे बहुतांश कर्मचारी हे कंत्राटी पद्धतीने असल्यामुळे ते काम चांगले करत नाही. पगार पण आम्हाला कमी जास्त ग्रामीण भागात खेटा चकरा मारण्या लागतात म्हणुन जास्तीत जास्त लाज कशा पद्धतीने घेता येईल ही त्यांची मानसिकता बनली आहे. कंत्राटी पगार नोकरी किती दिवस असते हे सांगता येत नाही. म्हणून ते जो पर्यत आपले पद आहे तो कमाई करावी अशी मानसिकता असल्याचे दिसून येते प्रधानमंत्री ग्रामीण आवास योजनेत या कर्मचाऱ्याच्या विरोधात लाच घेतल्याची तक्रार केली तर माझे काय करणार काय नोकरी काढणार काय माझी कंत्राटी काही भीती नाही. अशी मानसिकता ठेवून ते कुणालाही न घाबरता लाचेची मागणी करतांना दिसून येतात.

प्रधानमंत्री ग्रामीण आवास योजनेत आणखी एक महत्त्वाचा दोष म्हणजे या योजनेतील 18000 हजार रुपये अनुदान अकुशल कामगार यांच्या नावाने काढले जाते. प्रत्येक गावात रोजगार हमीवर एक रोजगार सेवक यांची नियुक्ती केली आहे. तो रोजगार सेवक रोजगार हमी कामगारांनी काम केल्याचे मस्टर भरुन देणे बंधनकारक असते. परंतु अनेक गावात रोजगार सेवक धनधाडग्या घरचे, राजकिय पुढाऱ्याचे नातेवाईक असतात हे रोजगार हमी मस्टर भरण्याचे व्यवस्थित काम करत नाही त्यामुळे बहुतांश लाभार्थीयांनी 18000 रुपचे अनुदान मिळत नाही. प्रधानमंत्री ग्रामीण आवास योजना ग्रामीण भागासाठी अतिशय महत्त्वाची आहे कारण या योजनेची अंमलबजावणी योग्यप्रकारे करणे गरजेचे आहे. या योजनेत काम करणारे शासकीय पूर्णवेळ नोकरीवर असणारे असावे तर काम चांगले होते अनेक घरकुल न बांधकामकरना अनुदान उचले आहे. हे वास्तव आहे. म्हणुन ग्रामीण भागात प्रत्येक सुरक्षित निवारा करण्यासाठी या योजनेची यंत्रणा ही पूर्णपो शासकीय असावी. प्रत्येक गावात किमान पंचायत समितीचे गटविकास अधिकारी ग्रामसेवक, गृहनिर्माण अभियंता, सरपंच आणि रोजगार सेवक यांच्या समन्वय ठेवून त्यांनी एका गावात 6 महिला एक बैठकीचे आयोजन करणे अतिशय महत्त्वाचे आहे. कारण त्यामुळे या योजनेत कोण कोणत्या अडचणी आहेत त्या कशा पद्धतीने दूर करता येतील यावर साधक-बाधक चर्चा घडवून आली तर ही योजना ग्रामीण भागातील

लोकांची एक मुलभूत गरज निवारा उपलब्ध करुन देण्यासाठी संजवनी ठरणार आहे. ग्रामपंचायत ग्रामसभा आजही गावात रजिस्टर होतांना दिसून येतात त्यामुळे गरजु लोकांना लाभ मिळत नाही. त्यामुळे पंचायत समितीतील विस्तार अधिकारी, गटविकास अधिकारी यांनी प्रत्येक्ष गावात जावून प्रत्यक्ष पाहणी करुन ज्यांना घर नाही त्यांना अगोदर लाभ दिलातर प्रधानमंत्री ग्रामीण आवास योजनेचा बळकटीकरण प्राप्त झाल्याशिवाय राहणार नाही.

**संदर्भ :-**

1. निरीक्षण
2. मुलाखत अनुसूची
3. 2 ऑक्टों. 2018 ग्रा.पं.कार्यालय, सावळेश्वर ता.कंधार येथील ठराव प्रत.
4. पंचायत समिती, कंधार येथील गटविकास अधिकारी यांचे अहवाल 2019-20
5. www.pradhanmantriawasyojna.nic.in
6. आर.के.रास्तोगी ग्रामीण समाज शास्त्र संजिव प्रकाशन मेरठ.

Aayushi International Interdisciplinary Research Journal
ISSN 2349-638X
www.aiirjournal.com